**SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE**

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART- TWO

---

गुरुवार, दिनांक २८ ऑगस्ट, २०२५

## अधिसूचना

क्रमांक : १४१ /२०२५. दिनाक : २८/०८/२०२५.

**विषय : विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा (विज्ञानगट), वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा, मानव विज्ञान विद्याशाखा तसेच आंतर विद्याशाखीय अभ्यासविद्याशाखेतील स्नातक स्तरावरील सी.जी.एस. व सत्र पद्धती प्रणालीतील प्रथम व द्वितीय वर्ष उत्तीर्ण विद्यार्थ्यांना सी बी.सी. एस. प्रणालीत तृतीय वर्ष पाचव्या सत्रात सामावून घेण्याबाबत.**

सदर्भ : अधिसूचना क्रमांक ७८/२०२४, दिनांक १६/०७/२०२४.

शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ पासून पदवी स्तरावरील शिखर संस्थाद्वारा संचालित अभ्यासक्रम जसे, फार्मसी, लॉ., एज्युकेशन, फिजीकल एज्युकेशन, एम.बी.ए., इंजिनिअरिंग या व्यतिरिक्त ईतर सर्व अभ्यासक्रमांस सी.बी.सी.एस. प्रणाली लागू करण्यात आली आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ हे या प्रणालीचे शेवटचे वर्ष आहे. उपरोक्त संदर्भिय अधिसूचनेन्वये विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत विज्ञान गटातील स्नातक स्तरावरील सी.जी.एस. व सत्र प्रणालीतील प्रथम व द्वितीय वर्ष उत्तीर्ण विद्यार्थ्यांना सी. बी. सी. एस. प्रणालीत तृतीय वर्ष पाचव्या सत्रात शैक्षणिक सत्र २०२४-२०२५ मध्ये सामावून घेण्यात आले होते.

आता, यानुषंगाने प्राधिकारिणीने घेतलेल्या निर्णयानुसार सर्व सामान्यांच्या माहितीकरिता अधिसूचित करण्यात येते की, शैक्षणिक सत्र २०२१-२०२२ व त्यापूर्वीच्या विविध विद्याशाखांमधील स्नातक स्तरावरील सी.जी.एस. व सत्र पद्धती मधील विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा (विज्ञान गट), वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा, मानव विज्ञान विद्याशाखा तसेच आंतरविद्याशाखीय अभ्यास वि द्याशाखेतील प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष परीक्षा उत्तीर्ण होऊन त्यानंतर तृतीय वर्षाला २०२२-२०२३, २०२३-२०२४ व २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षामध्ये काही तांत्रिक कारणांमुळे प्रवेश न घेतलेल्या (खंड पडलेल्या) विद्यार्थ्यांना सी.बी.सी.एस पद्धतीमध्ये २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षात तृतीय वर्ष पाचव्या सत्रामध्ये प्रवेश देण्याचा निर्णय विद्यापीठ प्राधिकारिणीने घेतला आहे.

परंतु, अशा पद्धतीमधील प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांना सी.बी.सी.एस. पद्धतीमधील सत्र १,२,३ व ४ ला अतिरिक्त असलेले विषय/बाबी जसे : जेनेरिक ओपन ईलेक्टीव्ह कोर्स, ॲबिलीटी एन्हांसमेंट कोर्स (महाविद्यालयीन स्तरावरील) इत्यादी बाबी सी.बी.सी.एस. पद्धतीकरिता वेळोवेळी निर्गमित निदेशांप्रमाणे पाचव्या व सहाव्या सत्रादरम्यान उत्तीर्ण/पूर्ण करणे अनिवार्य राहील. त्याशिवाय त्यांचा सहाव्या सत्राचा निकाल जाहीर करण्यात येणार नाही.

स्वा/-
(डॉ. अविनाश असनारे)
कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.